सोलापूर--- सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने दिनांक ०१/१२/२०२१ पासून रुग्णवाहिका व शववाहिका यांचे नवीन दर सर्वसाधारण सभा यांच्या मंजुरीनुसार लागू करण्यात आले आहे. IDH हॉस्पिटलमध्ये सोलापूर महानगरपालिकेकडील एकूण १२ रुग्णवाहिका व ४ शववाहिका १ कैलास रथ आहेत.Covid-19 च्या प्रादुर्भावामुळे गेले २ वर्ष अनेक अडचणींना सामोरे जात असताना व ओमायक्रोन हा नवीन व्हायरस जगात धुमाकूळ घालत असताना केंद्रशासन व राज्यशासनाने वेळोवेळी केलेल्या सूचनेनुसार Covid-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच मा.आमदार प्रणितीताई शिंदे यांच्या निधीतून १ शववाहिका,१रुग्णवाहिका,मा.आमदार श्री.सुभाषबापू देशमुख यांच्या निधीतून १ शववाहिका, मा.विरोधी पक्षनेता श्री.अमोलबापू शिंदे यांच्या निधीतून १ रुग्णवाहिका ,१ शववाहिका,मा.नगरसेवक श्री.रवी कय्यावाले यांच्या भांडवली निधीतून १ रुग्णवाहिका, मा. नगरसेवक श्री.किसन जाधव व श्री.नागेश गायकवाड यांच्या भांडवली निधीमधून १ रुग्णवाहिका शहर व शहराबाहेर गरजू लोकांना उपलब्ध करण्यात आले आहेत. सामान्य नागरिकांच्या आवाक्यात हे नवीन दर निश्चित करण्यात आले आहेत त्यानुसार मग ते दाराकडून १८ कंत्राटी वाहन चालक IDH हॉस्पिटल येथे रुजू झालेले आहेत. तरी सामान्य नागरिकांचे विचार करून RTO ने निश्चित केलेल्या दराच्या तुलनेने कमी दर आकारले आहेत. सदर रुग्णवाहिका व शववाहिका राज्याबाहेर सुद्धा सेवा देण्यात येणार आहे.तरी गरजू लोकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सोलापूर महानगरपालिकेचे उपआयुक्त धनराज पांडे यांनी केले.

रुग्णवाहिका व शववाहिका उपलब्ध करून घेणेकामी संपर्क क्रमांक -०२१७ – २३२३७००

मोबाइल नंबर ७७९८५३१८५५

मोबाईल नंबर ९७६६३७४५६६

सोबत दर पत्रक जोडत आहे

# सोलापूर महानगरपालिका,सोलापूर.

## जाहिर प्रसिध्दीकरण

**संदर्भः- सोलापूर महानगरपालिका मा.सर्वसाधारण सभा विषय क्र. १८९ ठराव क्र.२१२ दि.२४/९/२०२१**

सोलापूर शहरातील तमाम जनतेस या जाहिर प्रसिध्दीकरणाव्दारे कळविण्यात येते की, सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून सोलापूर शहरातील नागरीकांना त्याचे मागणीप्रमारे शुल्क आकारून रूग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

वरील संदर्भीय सोलापूर महानगरपालिका मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.१८९ ठराव क्र.२१२ दि.२४/९/२०२१ अन्वये सदर सेवेकरीता आकारावयाचे शुल्कबाबत मा.मनपा सभेने ठराव पारित केलेला आहे, त्यास अनुसरून सोलापूर शहरातील व शहराबाहेरील रूग्णवाहिका व शववाहिका ही वाहने खालीलप्रमाणे नमुद कलेप्रमाणे सुधारीत शुल्क आकारून सेवा पुरविण्यात येईल.

### शहरातील दर

| प्रकार | आकारण्यात येणारे शुल्क | | |
|---|---|---|---|
| | दर 25 किमी अथवा दोन तासापर्यंत | दर 25 किमी नंतर दर प्रती कि.मी.साठी | दोन तासानंतर प्रतिक्षा तास |
| मारुती ओमिनी | 250/- | 8/- | 25/- |
| टाटा सुमो/ विंगर/मेटॉडोर इत्यादी सदृश कंपनीने बांधणी केलेली रुग्णवाहिका | 300/- | 8/- | 40/- |
| टाटा 407/फोर्स ट्रॅव्हलर/स्वराज मझदा इत्यादी सदृश चेसेस वर बांधणी केलेली रुग्णवाहिका | 450/- | 8/- | 50/- |
| सर्व प्रकारच्या उत्पादकांचे अद्यावत वाहने | 500/- | 8/- | 50/- |

### शहरा बाहेरील दर

| प्रकार | आकारण्यात येणारे शुल्क | | |
|---|---|---|---|
| | दर 25 किमी अथवा दोन तासापर्यंत | दर 25 किमी नंतर दर प्रती कि.मी.साठी | दोन तासानंतर प्रतिक्षा तास |
| मारुती ओमिनी | 500/- | 11/- | 50/- |
| टाटा सुमो/ विंगर/मेटॉडोर इत्यादी सदृश कंपनीने बांधणी केलेली रुग्णवाहिका | 600/- | 12/- | 75/- |
| टाटा 407/फोर्स ट्रॅव्हलर/स्वराज मझदा इत्यादी सदृश चेसेस वर बांधणी केलेली रुग्णवाहिका | 900/- | 13/- | 100/- |
| सर्व प्रकारच्या उत्पादकांचे अद्यावत वाहने | 1000/- | 15/- | 100/- |

**वरील प्रमाणे नमुद सुधारीत शुल्क आकारणीची अंमलबजावणी ही दि. ०१/१२/२०२१ पासून करणेत येईल याची शहरातील सर्व नागरीकांनी नोंद घ्यावी.**

http://ambulance.solapurcorporation.org या वेबसाईटवरून किंवा MySolapur या Andriod Mobile App वरून बुकींग करता येईल.

रुग्णवाहिका व शववाहिका उपलब्ध करून घेणे कामी संपर्क क्र.: 0217-2323700

पी.शिवशंकर भा.प्र.से.
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका